| | | | |
|---|---|---|---|
| सीएनआर क्र. एमएचपीयु ०८००१४९९२०२२ | दाखल तारीख | : | ०६.१०.२०२२ |
| | नोंदणी तारीख | : | ०६.१०.२०२२ |
| | निकाल तारीख | : | २५.१०.२०२४ |
| | कालावधी | : | ०२वर्षे ००म. १९दि. |

नि.क्र. २७

भाग-अ

| न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग खडकी, पुणे यांच्या न्यायालयात<br>(पिठासीन अधिकारी - एल.व्ही.श्रीखंडे)<br>नियमित फौजदारी खटला क्र.४५५/२०२२ | |
|---|---|
| | गु.र.क्र. २३९/२०२२<br>दिघी पोलिस स्टेशन, पुणे |
| सरकार पक्ष | महाराष्ट्र शासन<br>मार्फत दिघी पोलिस स्टेशन, पुणे |
| सरकार पक्षातर्फे | विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. एन. डांगे |
| आरोपी | १. मारकंडे वैजनाथ यादव,<br>वय-५५ वर्षे, व्यवसाय – व्यवसाय<br>२. सुजीत मारकंडे यादव,<br>वय- ३० वर्षे, व्यवसाय – व्यवसाय<br>३. मनोज मारकंडे यादव,<br>वय- ३३ वर्षे, व्यवसाय – व्यवसाय<br>आरोपी क्र. १ ते ३ रा. गजानन नगर, श्रीराम कॉलनी, दिघी, पुणे |
| आरोपींतर्फे अधिवक्ता | विद्वान वकील कुमारी अकांक्षा जपे |

भाग-ब

| | |
|---|---|
| गुन्हा घडल्याचा दिनांक | १७/०६/२०२२ |
| फिर्याद दाखल दिनांक | १८/०६/२०२२ |
| आरोपपत्र दाखल दिनांक | ०६/१०/२०२२ |
| दोषारोप ठेवल्याचा दिनांक | ०२/०८/२०२४ |

| | |
|---|---|
| प्रकरणात पुरावा सुरु झाल्याची दिनांक | २३/१०/२०२४ |
| प्रकरण न्यायनिर्णयासाठी ठेवण्याची दिनांक | २५/१०/२०२४ |
| न्यायनिर्णय घोषित दिनांक | २५/१०/२०२४ |
| शिक्षा सुनविल्याचा आदेशाची दिनांक जर असेल तर | निरंक |

## आरोपीचा तपशील

| आरोपी क्र. | आरोपीचे नाव | पकडल्याचा दिनांक | जामिनावर सोडल्याचा दिनांक | अपराधाचा तपशिल | निर्दोष मुक्त केले किंवा शिक्षा केली | शिक्षा केली | संपरिक्षे दरम्यान आरोपींचा फौ.प्र.सं.क. ४२८ प्रमाणे शिक्षेचा कालावधी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मारकंडे वैजनाथ यादव | १८/०६/२२ | १८/०६/२२ | भा.दं.वि.चे क. ३२४,५०४, सह कलम ३४ व म. पो. अ. ३७ (१) सह १३५ प्रमाणे | निर्दोष मुक्तता झाली | -- | -- |
| २ | सुजीत मारकंडे यादव | १८/०६/२२ | १८/०६/२२ | वरील प्रमाणे | निर्दोष मुक्तता झाली | - | - |
| ३ | मनोज मारकंडे यादव | १८/०६/२२ | १८/०६/२२ | वरील प्रमाणे | निर्दोष मुक्तता झाली | - | - |

## भाग-क
## सरकार पक्षाच्या साक्षीदारांची यादी

| अ.क्र. | नाव | पुराव्याचा प्रकार |
|---|---|---|
| १. | सुनिल रामराव हातागळे (नि.क्र.२६) | फिर्यादी |
| २. | आशा शिवाजी इकर  (नि.क्र.२८) | साक्षीदार |
| ३. | शिवाजी जिजाबापू इकर (नि.क्र.२९) | साक्षीदार |

<u>निशाणी देण्यात आलेल्या वस्तु/कागदपत्रे</u>
<u>सरकार पक्षातर्फे</u>

| अ.क्र. | निशाणी | वर्णन |
|---|---|---|
| १. | निरंक | |

**बचावपक्षाने मान्य केलेल्या कागदपत्रांची यादी**

| अ.क्र. | निशाणी क्रमांक | कागदपत्रांचे स्वरुप |
|---|---|---|
| १. | घटनास्थळ पंचनामा | नि. ३० |
| २. | जखमीचे वैद्यकीय प्रमाणपत्र | नि. ३१ व ३२ |

## :: न्या य नि र्ण य ::
(घोषित तारीखः २५ ऑक्टोबंर, २०२४)

प्रस्तुत खटल्यात आरोपींविरुध्द भारतीय दंड संहिता १८६० कलम ३२४, ५०४ सह कलम ३४ व महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७ (१) सह १३५ प्रमाणे नुसार शिक्षेसपात्र अपराधासाठी संपरिक्षा घेण्यात आली.

<u>अभियोग पक्षाची थोडक्यात हकिकत किः</u>-

२. दिनांक १७/०६/२०२२ रोजी २३.३० वाजेच्या सुमारास संत गजानन महाराज नगर, श्रीराम कॉलनी नं. १, दिघी येथे फिर्यादीचा मावसभाउ शिवाजी जिजाभाउ इकर यांनी आरोपी क्र. १ ने सिगारेट मागितले असता त्याचा राग येवून आरोपींनी संगनमताने फिर्यादीस, त्याच्या मावसभावास व मावसभावाच्या पत्नीला हाताने व वेळूच्या बांबूने मारहाण करुन जखमी केले म्हणून फिर्यादी यांनी दिघी पोलिस स्टेशन येथे आरोपींविरुध्द तक्रार दिली.

३. उपरोक्त आशयाच्या फिर्यादवरुन आरोपींविरुध्द दिघी पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्र.२३९/२०२२, भारतीय दंड संहिता १८६० कलम ३२४,५०४, सह कलम ३४ व महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७ (१) सह १३५ प्रमाणे गुन्हा नोंदविण्यात आला. सदर गुन्ह्याचा तपास दिघी पोलिस ठाण्याचे पोलिस उपनिरीक्षक

बी.एच. शिखरे यांच्याकडे सोपविण्यात आल्याने त्यांनी साक्षीदारांचे जबाब नोंदविले, घटनास्थळी जावुन घटनास्थळ व जप्ती पंचनामा केला, जखमींचे वैद्यकीय प्रमाणपत्र प्राप्त केला. नियमित तपासाअंती आरोपींविरुध्द पुरावा गोळा झाल्याने त्यांनी न्यायालयात दोषारोप पत्र (नि.क्र.०१) दाखल केले.

४. आरोपी न्यायालायात हजर झाल्यानंतर आरोपींवर भारतीय दंड संहिता १८६० कलम ३२४, ५०४ सह कलम ३४ व महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७ (१) सह १३५ अन्वये शिक्षेसपात्र अपराधाचा दोषारोप (नि.क्र.२१) ठेवुन तो आरोपींना त्यांच्या बोलीभाषेत वाचुन व समजावुन सांगीतला असता आरोपींने निवेदनात (नि.क्र.२२ ते २४ ) गुन्हा कबुल नसल्याचे कथन करुन खटल्याची संपरिक्षा घेण्याची विनंती केली. तद्नंतर आरोपींविरुध्द सबळ साक्षी पुरावा अभिलेखावर न आल्यामुळे आरोपींचे फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ कलम ३१३(१)(ब) प्रमाणे निवेदन नोंदविण्यात आले नाही.

५. अभियोग पक्षातर्फे विद्वान सहाय्यक सरकारी अभियोक्ता श्रीमती. एस. एन. डांगे व बचाव पक्षातर्फे विद्वान विधीज्ञ कुमारी अकांक्षा यांचा युक्तीवाद ऐकला. अभिलेखावरील कागदपत्रांचे व तोंडी पुराव्याचे बारकाईने अवलोकन केले. खालील मुद्दे खटल्याच्या न्यायनिर्णयासाठी उपस्थित झाले. त्यावर मी कारणांसह पुढीलप्रमाणे निष्कर्ष नोंदविला आहे.

| अ.क्र. | मुद्दे | निष्कर्ष |
|---|---|---|
| १. | अभियोग पक्ष शाबित करतो काय कि, दिनांक १७/०६/२०२२ रोजी २३.३० वाजेच्या सुमारास संत गजानन महाराज नगर, श्रीराम कॉलनी नं. १, दिघी येथे येथे आरोपींनी संगनमताने फिर्यादीचे मावसभाउ यांनी सिगारेट मागितले असता फिर्यादी व त्याचे मावसभावास आरोपींनी वेळूच्या बांबूने मारहाण करुन जखमी केले आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० कलम ३२४ सह कलम अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला आहे ? | ....नाही |

| | | |
|---|---|---|
| २. | अभियोग पक्ष शाबित करतो काय कि, वरील नमूद कालावधी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने फिर्यादी व त्याचा मावसभाउ व साक्षीदार अशा इकर यांना शिवीगाळ करुन अपमानित केले आणि त्यायोगे भारतीय दंड संहिता, १८६० कलम ५०४ सह कलम ३४ अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला आहे ? | ....नाही |
| ३. | अभियोग पक्ष शाबित करतो काय कि, वरील नमूद कालावधी व ठिकाणी आरोपींनी संगनमताने पोलिस आयुक्त, पिंपरी चिंचवड यांच्या कार्यालयीन आदेशान्वये केलेल्या नियमांचे उल्लघंन करुन आरोपींचे ताब्यात वेळूचा बांबु मिळून आले आणि त्यायोगे महाराष्ट्र पोलिस अधिनियम कलम ३७ (१)(अ) सह कलम १३५ अन्वये शिक्षेसपात्र अपराध केला आहे ? | ....नाही |
| ४. | अंतिम आदेश काय ? | ...अंतीम आदेशाप्रमाणे |

## का र ण मि मां सा

६. प्रस्तुत खटल्यात आरोपींच्या वकीलांनी नमुद केले की, आरोपींची व फिर्यादीची न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाली व खटला निकाली काढण्याची विनंती केली. आरोपींविरुध्द गुन्हा सिध्द करण्यासाठी अभियोग पक्षाने फिर्यादीच्या तोंडी पुराव्यावर भिस्त ठेवली. दोन्ही पक्षांनी तडजोड पुरसिस निशाणी क्र. २५ अभिलेखावर दाखल केली. तसेच दोन्ही पक्षांचे म्हणणे ऐकले.

### मुद्दा क्र.१ ते ३ करिताः-

७. आरोपींनी संगनमताने फिर्यादी, त्याचा मावसभाउ व मावसभावाची बायको यांना शिवीगाळ करुन वेळूच्या बांबुने मारहाण करुन जखमी केले किंवा कसे ही बाब पडताळण्याकरीता फिर्यादी सुनिल रामराव हतागळे (सा.क्र.१) (नि.क्र.२६) साक्षीचे अवलोकन करणे अत्यंत आवश्यक आहे. फिर्यादीने त्याच्या सरतपासात नमुद

केले आहे की, त्यांची व आरोपींची भांडणे झाले होते म्हणून त्यांनी तक्रार दाखल केली होती. फिर्यादीने त्यास घटनेबद्दल काही माहित नसल्याचे सांगितले. फिर्यादीने पुढे त्याने दाखल केलेल्या फिर्यादीतील मजकुर त्यास माहित नाही असे नमुद केले. फिर्यादी अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विद्वान सरकारी वकिलांनी फिर्यादीची कसुन उलटतपासणी घेतली होती. परंतु उलटतपासणी दरम्यान कोणताही गुन्हाजन्य पुरावा आरोपी विरुध्द अभिलेखावर येवु शकलेला नाही. तसेच सदर साक्षीदाराने त्याच्या उलटतपासात मान्य केले की, त्याची व आरोपींची आपसात तडजोडी झालेली आहे. आरोपींविरुध्द दाखल केलेली फिर्याद अभियोग पक्षाने शाबीत केलेली नाही. सबब फिर्यादीची साक्ष, आरोपींचा गुन्हा शाबीत करण्याइतपत भक्कम व पुरेशी नाही.

८. साक्षीदार आशा शिवाजी इकर (सा.क्र.२) (नि.क्र.२८) व शिवाजी जिजाबापू इकर (सा.क्र.३) (नि.क्र.२९) यांचे साक्षीचे अवलोकन करणे अत्यंत आवश्यक आहे. साक्षीदारांने त्यांच्या सरतपासात नमुद केले आहे की, त्यांच्यात व आरोपींमध्ये किराकोळ भांडण झाले होते म्हणून त्यांच्या भावाने / दीराने पोलिस स्टेशनमध्ये तक्रार दाखल केली होती. साक्षीदार हे अभियोग पक्षास सहकार्य करीत नसल्याने विध्दवान सहकारी वकिलांनी फिर्यादीची कसुन उलटतपासणी घेतली होती. परंतु उलटतपासणी दरम्यान कोणताही गुन्हा जन्य पुरावा आरोपींविरुध्द अभिलेखावर येवु शकलेला नाही. तसेच सदर साक्षीदारांने त्यांच्या उलटतपासात मान्य केले की, त्यांची व आरोपींची आपसात तडजोडी झालेली आहे. आरोपींविरुध्द दाखल केलेली फिर्याद अभियोग पक्षाने शाबीत केलेली नाही. सबब साक्षीदाराची साक्ष, आरोपींचा गुन्हा शाबीत करण्याइतपत भक्कम व पुरेशी नाही.

९. सदर फिर्यादीचे व जखमी साक्षीदारांचे साक्षीचे अवलोकन केले असता प्रामुख्याने असे निर्देशनास येते की, फिर्यादी व आरोपींचे न्यायालयाबाहेर तडजोड झालेले आहे. त्याचप्रमाणे सदर साक्षीदाराच्या साक्षीत कोणताही गुन्हाजन्य पुरावा आरोपींविरुध्द आलेला नाही. म्हणून साक्षीदारांची साक्ष आरोपींचा गुन्हा सिध्द करण्याइतपत भक्कम व पुरेशी नाही.

१०. अभियोग पक्षाच्या उपरोक्त तोंडी व कागदोपत्री पुराव्याचे बारकाईने

अवलोकन केले. या ठिकाणी नमुद करण्यासारखी बाब म्हणजे, फिर्यादीची आरोपीसोबत न्यायालयाबाहेर आपसी तडजोड झाल्याने फिर्यादीस प्रकरण चालविण्याचे इतर कोणतेही स्वारस्य राहिलेले नाही. अभियोग पक्षाने फिर्यादीचे इतर स्वतंत्र साक्षीदार देखील तपासलेले नाही. त्यामुळे भारतीय दंड संहिता १८६० कलम ३२४, ५०४, सह कलम ३४ व महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७ (१) सह १३५ घटक आरोपींविरुध्द शाबित होवु शकलेले नाही. अशा परिस्थीतीत आधारहिन पुराव्याअभावी आरोपींना दोषी धरणे न्यायोचित होणार नाही. एकंदरीत परिस्थीतीचा सांगोपांग विचार करता अभियोग पक्षाने आरोपींवर ठेवलेले आरोप संशयाच्या पलिकडे जावुन निर्विवादपणे सिध्द होण्या इतपत भक्कम वाटत नाही. त्यामुळे अभियोग पक्षाच्या खटल्याबद्दल संशय उत्पन्न होतो व सदर संशयाचा फायदा आरोपींना देणे क्रमप्राप्त ठरते. त्यामुळे मी मुद्दा क्र.१ ते ३ चा निष्कर्ष नकारार्थी नोंदविला आहे.

<u>मुद्दा क्र. ४ करिताः-</u>

११. फौजदारी प्रकरणामध्ये आरोपींवर ठेवण्यात आलेले आरोप हे वाजवी संशयाच्या पलिकडे जावुन सिध्द करणे आवश्यक असते. मात्र प्रस्तुत प्रकरणातील फिर्यादीची साक्ष हीच संशयास्पद असुन इतर साक्षीदारांना अभियोग पक्षाने तपासलेले नाही. तसेच अभियोग पक्षाचे पंच साक्षीदार व प्रत्यक्षदर्शी साक्षीदाराने देखील अभियोग पक्षाच्या खटल्याला समर्थन केले नाही. परिणामी आरोपींना संशयाचा फायदा मिळुन निर्दोष मुक्त होण्यास ते पात्र ठरतात. सबब, मुद्दा क्र. ४ च्या उत्तरादाखल पुढील प्रमाणे आदेश पारित करीत आहेः

**<u>:: आ दे श ::</u>**

१. आरोपी क्र.१. मारकंडे वैजनाथ यादव, २. सुजित मारकंडे यादव व ३. मनोज मारकंडे यादव यांची फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ कलम २४८(१) अन्वये भारतीय दंड संहिता १८६० कलम ३२४, ५०४ सह कलम ३४ व महाराष्ट्र पोलिस अधिनियम ३७ (१) सह १३५ अन्वये शिक्षापात्र अपराधातुन निर्दोष मुक्तता करण्यात येते.

२. प्रकरणातील जप्त मुद्देमाल एक लाकडी दांडका व दगड हे मुल्यहिन असल्याने अपील कालावधीनंतर नष्ट करण्यात यावा.

३. आरोपींचे जामिन व बंधपत्र रद्द करण्यात येते.

४. प्रस्तुत प्रकरणातील आरोपींनी फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम ४३७अ प्रमाणे पुर्तता करावी.

(न्यायानिर्णय खुल्या न्यायालयात घोषित करण्यात आला.)

LALIT VASANTRAO SHRIKHANDE
Digitally signed by LALIT VASANTRAO SHRIKHANDE
Date: 2024.10.25 15:27:10 +0530

(एल. व्ही. श्रीखंडे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
न्यायालय क्र.३, खडकी, पुणे

दिनांकः २५/१०/२०२४.